तरुण भारत सोमवार, २७ जून २०१६

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र इमारतीचे भूमिपूजन आणि डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकल मनिषा वर्मा, चंद्रकांत पाटील, डॉ. देवानंद शिंदे, विनोद तावडे, संभाजीराजे आदी.

बदलत्या तंत्रज्ञानानुसार अभ्यासक्रम तयार केला पाहिजे

प्रतिनिधी
कोल्हापूर

सध्या उच्च व तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. कारण ज्ञानाच्या कक्षा आंतरराष्ट्रीय झाल्या आहेत. तंत्रज्ञानामुळे जगातील सर्व ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे भारतातील विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण देण्यासाठी बदलत्या तंत्रज्ञानानुसार विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रम तयार केला पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र इमारतीचे भूमिपूजन आणि डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामध्ये व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन कळ दाबून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तर राजर्षी शाहू केंद्र व मुक्तिम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन कळ दाबून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती, रूसाच्या महाराष्ट्र प्रकल्प संचालिका मनिषा वर्मा उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतामध्ये पारंपरिक पद्धतीने पदवी किंवा इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी २५ टक्के विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळते. हे सर्वेक्षणाअंती निदर्शनास आले आहे. कारण त्यांना प्रात्यक्षिकाचे ज्ञान कमी असते. म्हणून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. सुधारित अभ्यासक्रमामुळे यांना प्रात्यक्षिक मिळाले तर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकावेळी शंभर महाविद्यालयामध्ये ज्ञान पोहचू शकते. जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांनाही तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जाते. इंग्रजी शाळा सोडून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अनेक उदाहरणे समोर आली आहेत. विद्यापीठाने २८ व्या क्रमांकावरून भविष्यात पहिले स्थान मिळवावे, यासाठी प्रयत्न करा असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे म्हणाले, 'रूसा'मुळे राज्यात खऱ्या अर्थाने शैक्षणिक कार्याला गती मिळाली आहे. या अभियानातून विद्यापीठाच्या निरनिराळ्या विभिन्न शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विद्यापीठांनी काम करणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाला ५५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यामुळे भविष्यात शिवाजी विद्यापीठाला एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशात अव्वल दर्जा मिळाला पाहिजे, असे आवाहनही शिक्षणमंत्री तावडे यांनी केले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना विशेष पद प्रदान करून विद्यापीठाच्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरव केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्वागत केले. बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, महेश काकडे, अजित चौगुले, डॉ. डी. के. गायकवाड, आमदार अमल महाडिक, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी आदी उपस्थित होते.